# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 18/2023 दिनांक : 12.01.2023**

## 1)जबरी चोरी :–

**1)बिलोली :**–दिनांक 11.01.2023 रोजी चे 11.05 वा. चे सुमारास, **बिलोली ते देगलुर जाणारे मेन रोडवर खतगाव पाटीजवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** फिर्यादी हा त्याचे मो सा वरून बिलोली ते देगलुर जात असतांना मुतन्याळ गावाजवळील खतगाव पाटीजवळ रोडवर दोन अनोळखी ईसम स्कुटीवरून येऊन फिर्यादीचे समोर स्कुटी लाऊन आम्ही पोलीस असल्याचे बतावणी करून लायसन्स दाखव असे म्हणुन फिर्यादीचे गळयाला चाकुचा धाक दाखवुन त्याचे हातातील बोटातील एक तोळयाचे सोन्याचे दोन अंगटया किंमती अंदाजे 40,000/–रूपयाच्या जबरीने काढुन घेवुन धाक दाखवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी मालु देवराव कांबळे, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी सेवक रा. मलकापुर पो. देगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 05/2023 कलम 392, 170, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री ए एन नरूटे, मो.क्रं. 9823802677** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)कुंटूर :**–दिनांक 06.01.2023 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **मौ. बळेगाव शिवार व्यंकटी महाजन यांचे शेताजवळ रोडच्या समोर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा त्याचे चुलत्या बरोबर पोस्टेला, कोर्टाला अर्ज बाजारी करीत आहे. या कारणावरून गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी आणि फिर्यादीचे आई यांचा रस्ता अडवुन मो सा वरून खाली पाडुन लोखंडी रॉडने व काठीने फिर्यादीला जबर मारहाण केली फिर्यादीचे उजवा हात फॅक्चर केले. फिर्यादीचे आईला थापड बुक्याने मारहाण करून अश्लील भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी परमेश्वर पि. गोविंद बेलकर, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. बळेगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 07/2023 कलम 326, 341, 294,143, 147, 148, 149, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आटकोरे, मो. नं. 8669182128** हे करीत आहेत.

**2)उमरी :**–दिनांक 10.01.2023 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **मौ. कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा किराणा सामान घरी नेत असतांना त्यातील आरोपी त्याचे घरासमोर फिर्यादीस मोबाईलवर फोन आल्याने फोनवर बोलत थांबला असता त्यातील आरोपीने अश्लील शिवीगाळ करून तु इथे फोनवर का बोलत आहेस असे म्हणुन आरोपीने हातातील काठीने फिर्यादीच्या मांडीवर, कमरेवर व पाठीत मारून गंभीर दुखापत केली. सदरचे भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची आई आली असता तीस पण आरापीने काठीने उजव्या हातावर मारून फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी प्रविण बाबुराव गायकवाड, वय 28 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कुदळा ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 08/2023 कलम 325, 294, 323, 504, 506, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री भोसले, मो. नं. 7038833358** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)उस्माननगर :**– दिनांक 01.08.2021 ते 01.11.2022 चे दरम्यान, **हिपरगा थडी ता. बिलोली ह. मु. काटकलंबा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला कांही कामधंदा येत नाही तुझ्या आई वडीलांनी लग्नात हुंडा दिला नाही व्यवसाया करीता माहेरहुन एक लाख रूपये आण म्हणुन शारिरीक व माणसीक छळ करून घरातुन हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 04/2023 कलम 498(अ), 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1119 श्रीमंगले मो.क्रं. 7414945161** हे करीत आहेत.

**2)कंधार :**– लग्न झाल्याचे नंतर एका वर्षापासुन **ते** दिनांक 11.01.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी मौ. घोडज /सिध्दार्थनगर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये तुला चांगले वागवतोत. पैसे नाही दिले तर तुला नांदवुन घेणार नाही असे महणुन शारिरीक व माणसीक छळ करून मारहाण केली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 08/2023 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप मो. क्रं. 9421849989** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**विमानतळ :–**दिनांक 02.01.2023 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **मयताचे आईचे राहाते घर गुरूनगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे पती **मयत नामे सौ. अश्विनी भ्र. राजु निलेवार, वय 32 वर्षे, रा. गरूनगर नांदेड** हीस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून मयतास वेळोवेळी माणसीक त्रास दिल्याने आरोपीतांचे त्रासाला कंटाळुन व तिच्या पतीने दुसरे लग्न करून फारकत मागत असल्याने मयताने विषारी औषध पिऊन आत्महत्या केली. सदर आत्महत्येस यातील नमुद आरोपीतांनी प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी ताराबाई आशोक पंदीलवाड, वय 50 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गरूनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 10/2023 कलम 306, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अनलदास, मो.नं. 7020201376** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 11.01.2023 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **बळीरामपुर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी कट्टा (अग्नीशस्त्र) चार जिवंत काडतुस बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/पांडुरंग माने, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 14/2023 कलम 3/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बिचेवार, मो.क्र. 7414945161** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)सोनखेड :–** दिनांक 11.01.2023 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **मौ. मडकी बसस्टँड ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2100/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री विशाल दिपक भोसले, ने. पोस्टे सोनखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 7/2023 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1916 पांपटवार, मो.नं. 9823079789** हे करीत आहेत.

## 7)रानडुकराचे हल्यात मृत्यु :–

**1)मुखेड :–** दिनांक 05.12.2022 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **मौ. चांडोळा शिवारात शेळया चारत असतांना ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे मल्हारी माधव तोरटे, वय 31 वर्षे, रा. पाळा ता. मुखेड जि. नांदेड** हा मौ. चांडोळा शिवारात शेळया चारत असतांना रानडुकराने पाठीमागुन मयतास जोराची धडक दिल्याने जखमी झाल्याने त्यास स. द. मुखेड येथे उपचार करून पुढील उपचार कामी स. द. विष्णुपूरी नांदेड येथे वार्ड नंबर 30 शरीक केले असल्याने उपचारा दरम्यान दि. 11.12.2022 रोजी मरण पावला. आज रोजी कागदपत्र उशिराने प्राप्त झाल्याने गुन्हा उशिराने दाखल झाला आहे. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2093, एस के बयास, ने. पोसटे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं. 01/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री वाघमारे, मो.क्र. 9923481762** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 19/2023 दिनांक : 12.01 .2023</u>

पोलीस अधिक्षक कार्यालयात "**राजमाता माँ जिजाऊ साहेब**" आणि "**स्वामी विवेकानंद**" यांची जयंती साजरी

12 जानेवारी, 2023 गुरूवार रोजी "**राजमाता माँ जिजाऊ साहेब**" आणि "**स्वामी विवेकानंद**"यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली, **मा. श्री अभिनेश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड यांनी दोन्ही प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन केले. तसेच या प्रसंगी **मा. श्री. द्वारकादास चिखलीकर**, पोनि स्थागुशा, **श्री शिवाजी लष्करे,** सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्री आशोक शिंदे उर्फ देशमुख**, वाचक तथा पोउपनि या सर्व उपस्थितांनी दोन्ही थोर व्यक्तीस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले. या प्रसंगी यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/सुर्यभान कागणे, मपोकॉ/शामका पवार,** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

